परिशिष्ट-II

## सार्वजनिक उत्सव २०२५ साजरा करण्याच्या परवानगीसाठी खाजगी जागेवर तात्पुरते मंडप बांधणीकरीता सादर करावयाचे हमीपत्र

(सदर हमीपत्र संगणकीय प्रणालीमधून डाऊनलोड करावे. परिपूर्ण हमीपत्र स्वाक्षरीसह संगणकीय प्रणालीमध्ये अपलोड करावे).

मी / आम्ही (सोसायटी/संकुल/खाजगी जागा इ.चे नाव व पत्ता) ______________________________ उत्सव २०२५ साजरा करणेसाठी खालील हमीपत्र सारासार विचार करुन देत आहोत.

१) पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने स्थापन करावयाची मूर्ती, सजावट आणि देखावे शक्यतो शाडू माती/पर्यावरणपूरक साहित्याने घडविलेली असावी याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत असलेल्या आवाहनाची मला जाणीव आहे.

२) पाच वर्षासाठी मंडप परवानगी प्राप्त झाल्यास, दरवर्षी उत्सवापूर्वी मंडप परवानगीचे नुतनीकरण करतेवेळी मा. उच्च न्यायालयाच्या वेळोवेळी पारीत होणा-या आदेशानुसार, सुधारीत हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे, हि बाब मला/आम्हाला मान्य आहे.

३) विभाग कार्यालयामार्फत आयोजीत करण्यात येणारे आपत्कालीन व्यवस्थापन कार्यशाळेकरीता या मंडळाचे २ स्वयंसेवक उपस्थित राहतील.

४) मा. उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र. ९६/२०२४ मधील दिनांक ०९.०६.२०२५ रोजीचे अंतरिम आदेश व त्याअनुषंगाने वेळोवेळी पारीत होणा-या आदेशांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक असेल, हि बाब आम्हाला मान्य आहे.

५) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि. १२.०५.२०२० रोजी मूर्ती विसर्जनासंबंधी जारी केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचना मला/आम्हांला ज्ञात आहेत.

६) बृहन्मुंबई म.न.पा., अग्निशमन विभाग, पोलीस विभाग यांनी वेळोवेळी लागू केलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल.

७) काही विशिष्ट परिस्थितीत दिलेली परवानगी काढून घेण्याचे अधिकार महानगरपालिका राखून ठेवत आहे, हे आम्हाला मान्य आहे.

८) जागा मालक / सोसायटी/ संकुल (सेक्रेटरी) यांची ना हरकत प्राप्त करुन परिशिष्ट-IV मध्ये सादर करण्यात येत आहे.

(-------------------------------)
सार्वजनिक उत्सव मंडळ अध्यक्ष नाव व स्वाक्षरी –

(-------------------------------)
सार्वजनिक उत्सव मंडळ सचिवाचे नाव व स्वाक्षरी –